# कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय,
# दापोली. जि. रत्नागिरी.

---

जा.क्र.कृअतंम/वसतिगृह/१६८५/२०१८ दिनांक :— २५ मे २०१८

## <u>नोटीस</u>

कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या **रत्नदुर्ग मुलांच्या** वसतिगृहासाठी समूह मेस/ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण) तयार करून पुरविणे आवश्यक आहे. सदर काम ठेका पध्दतीने करुन घ्यावयाचे आहे. त्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचा योग्य तो परवाना असणाऱ्या परवाना धारक ठेकेदारांनी दिनांक **०९.०६.२०१८** पूर्वी या कार्यालयास एकूण कामाचे स्वरुप प्रत्यक्ष पाहणी करुन, तसेच सदर ठेक्याच्या अटी शर्ती आणि सविस्तर माहिती यानुसार खर्चाचे दरपत्रक बंद लखोटयामध्ये निम्न स्वाक्षरीकारांकडे सादर करावे. सदर ठेक्याबाबतचे कोरे अर्ज व त्यांचे अटी शर्ती आणि सविस्तर माहिती वसतिगृह कार्यालयामध्ये दिनांक २८.०५.२०१८ ते ०९. ०६.२०१८ पर्यंत कार्यालयीन वेळेत रोख रक्कम रु. १००/— भरुन उपलब्ध होतील.

**सहयोगी अधिष्ठाता**
कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय,
दापोली. जि. रत्नागिरी.

प्रत :— १) ग्रामपंचायत, गिम्हवणे/जालगांव.
२) नगरपंचायत, दापोली.
३) कृषि महाविद्यालय/कृषि वनिकी महाविद्यालय/कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, दापोली.
४) जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, बंदर रोड, रत्नागिरी यांना माहितीसाठी.

# कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय,
# दापोली. जि. रत्नागिरी.

## निविदा फॉर्म

प्रति,

**मा. सहयोगी अधिष्ठाता,**

कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय,

दापोली.

**विषय** :— कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वसतिगृहासाठी समूह मेस/ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण) तयार करून पुरविणेबाबत ....

महोदय,

आपल्या कार्यालयाची नोटीस जा. क्र. कृअतंम/वसतिगृह/मेस/ /२०१७ दिनांक .................. नुसार मी वसतिगृहासाठी समूह मेस/ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण) तयार करून पुरवू इच्छितो. त्यासाठी खालीलप्रमाणे माझे दर ठेव आहे. कृपया माझे दरपत्रक मंजूर करावे.

| कामाचा प्रकार क्रमांक | तपशील | दर रु. अंकी/ अक्षरी नमुद करावे. |
|---|---|---|
| १. | समूह तत्वावर विद्यार्थ्यांनी पुरविलेल्या साहित्याचे जेवण तयार करुन वितरण करणे व स्वच्छता करणे. | |
| २. | ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण) तयार करून वितरण करणे व स्वच्छता करणे. | |
| ३. | समूह तत्वावर विद्यार्थ्यांनी पुरविलेल्या साहित्याचे नाष्टा तयार करुन वितरण करणे व स्वच्छता करणे. | |
| ४. | ठेका तत्वावर नाष्टा तयार करून वितरण करणे व स्वच्छता करणे. | |

**प्रतिज्ञापत्र**

मी समूह मेस/ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण) व नाष्टा तयार करून पुरविणेबाबतच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. माझे दरपत्रक स्विकारण्यात आल्यास मी महाविद्याल्याने ठरविलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करिन याबाबतचे करारपत्र रू १००/— मात्रचे बॉण्डपेपरवर स्वखुशीने व स्वखर्चाने करून देईल.

ठिकाण :

दिनांक :— सही :

ठेकेदाराचे नांव :

व पत्ता :

सोबत जोडलेले कागदपत्र:—१. अन्न व औषध प्रशासनाचा परवाना.

२. निवासाचा पुरावा

३. अटी व शर्ती मंजुर असल्याचे प्रतिज्ञापत्र

## समूह मेस/ठेका तत्वावर स्वयंपाक (जेवण) व नाष्टा तयार करण्यासाठी सर्व साधारण अटी

| अ.क्र. | वसतिगृहाचे नांव | विद्यार्थी / विद्यार्थीनी अंदाजे संख्या |
|---|---|---|
| १. | रत्नदुर्ग विद्यार्थी वसतिगृह (प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्ष विद्यार्थी) | १०० |

१. सदर मेस समूह/ठेका तत्वावर एक वर्षे कालावधीसाठी चालविण्यासाठी द्यावयाची असून या मेसच्या बाबत दर नोंदवताना स्वादिष्ट, चांगल्या प्रतीचे अन्न शिजवून देणे (भात, भाजी, चपाती, डाळ व आठवडयातून ३ वेळा अंडी/मासे/चिकन/मटण/खिर/बासुंदी/फ्रुट सॅलेड/शिकरण यांपैकी दोन) शिवजलेल्या अन्नाचे दैनंदिन वितरण व मेसची स्वच्छता गृहीत धरुन याबाबतचे दर द्यावेत.

२. सदर मेस समूह/ठेका तत्वावर चालविण्यासाठी द्यावयाची असून या मेसच्या बाबत दर नोंदवताना नाष्टा देणे (पोहे, उपमा, खिचडी, शिरा, आम्लेट, मिसळ, वडापाव यांपैकी एक व चहा) शिवजलेल्या अन्नाचे दैनंदिन वितरण व मेसची स्वच्छता गृहीत धरुन याबाबतचे दर द्यावेत.

३. सदर दरपत्रकासोबत ठेकेदारांकडे अन्न व औषध प्रशासनाचा अधिकृत योग्य तो परवाना असणे बंधनकारक आहे. असा परवाना नसणाऱ्या ठेकेदाराच्या दरपत्राचा विचार करण्यात येणार नाही.

४. दरपत्रका सोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावित.

५. ज्या ठेकेदाराचे दरपत्रक स्विकारण्यात येईल त्या ठेकेदारास रू १००/— मात्रचे बॉण्डपेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

६. कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रक कोणत्याही कारणास्तव नामंजूर करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

७. दरपत्रकामध्ये नमुद केलेले काम कमी/जास्त होण्याची शक्यता आहे किंवा संपुर्ण किंवा एखादे काम रदद्‌ही करणेत येईल. प्रत्यक्षात केलेल्या कामाचेच देयक अदा केले जाईल.

८. आदेशीत केलेले काम पुर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे देयक अदा केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

९. निविदापत्रकामध्ये खाडाखोड, बदल किंवा नमुद केलेल्या दराचे व रक्कमेचे आकडे गिरवणे इ. गोष्टी आढळुन आल्यास सदरची निविदा रदद्‌ केली जाईल.

१०. एका पेक्षा जास्त पुरवठाधारकांनी सारखेच दर दिल्यास समूह/ठेका तत्वावरील मेसमध्ये जेवण पुरवठयाचे आदेश कोणास द्यावे/ विभागून द्यावे याबाबतचे हक्क महाविद्यालयाकडे ठेवण्यात आला आहे.

११. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजन प्रबंधाकरीता प्रत्येक वसतिगृहात एका भोजनगृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रत्येक भोजन व्यवस्था सांभाळण्यासाठी विद्यार्थ्यांची 'भोजन समिती' नेमली जाते. सेक्रेटरी, खजिनदार व सामान्य सदस्य असतात. आवश्यकतेनुसार सदर समितीच्या सदस्य संख्येत वसतिगृह चिटणीस यांच्या परवानगीने बदल होवू शकतो. भोजनगृह समूह तत्वावर अथवा विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार ठेका पध्दतीने चालविण्यात येईल.

१२. प्रत्येक महिन्यांकरीता वसतिगृहातील भोजनगृहामध्ये जेवण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांमधून पाच नवीन सदस्यांची मेस कमिटी सर्वानूमते निवडण्यात येईल व या समितीमार्फत भोजन विभागाची व्यवस्था पाहिली जाईल. सदरची संख्या कमी जास्त होवू शकते.

१३. सदरहू ठेकेदार भोजन विभागातील स्वच्छता, नीटनेटकेपणा, भांडयांचा वापर, खरेदी करण्यात आलेले धान्य, भाजीपाला, फळे इत्यादी बाबतीत जबाबदार समजला जाईल.

१४. प्रत्येक विद्यार्थ्यांचे महिन्यातील फक्त चार खाडे पूर्वपरवानगी घेतली असल्यास ग्राहय धरण्यात येतील. प्रत्येक विद्यार्थ्यास २६ दिवसांचे मेस बिल जमा करणे बंधनकारक असेल. तसेच इतर

शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमात विद्यार्थी सहभागी असल्यास महाविद्यालय प्रशासनाच्या परवानगीने सूट देण्यात येईल.

१५. संबंधीत वसतिगृह निवासी विद्यार्थ्यांव्यतिरिक्त बाहेरील कोणत्याही इसमास वसतिगृहातील भोजनगृहात जेवण देण्यास/घेण्यास सक्त मनाई राहील. तसे आढळून आल्यास संबांधीत ठेकेदारावर दंडात्मक ठेका रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

१६. प्रत्येक महिन्यांकरीता वसतिगृहातील भोजनगृहामध्ये जेवण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरीची नोंद हि स्वत: ठेकेदाराला ठेवावी लागेल. तसेच प्रत्येक महिन्याच्या हजेरीनुसार मेस बिलाची वसुली ही देखील ठेकेदारालाच करावी लागेल. प्रसंगी काही अडचण आल्यास वसतिगृह प्रशासनाकडुन मदत केली जाईल.

१७. भोजन शिजवण्यासाठी ताब्यात दिलेले साहित्य, इमारत, रस्ता, कुपंण इ. ची मोडतोड किंवा नुकसानीस ठेकेदार जबाबदार असेल व ते तो स्वखर्चाने भरून देईल /दुरुस्त करेल.

१८. भोजन व्यवस्थेसंबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास त्यासंबंधी वसतिगृह चिटणीस व वसतिगृह प्रमुख योग्य ती शहानिशा करून निर्णय घेतील आणि सदर निर्णय हा अंतिम असेल.

१९. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या वेळापत्रकाप्रमाणे मेस चालविणे बंधनकारक आहे.

२०. प्रत्येक ठेकेदारास नाष्टयाच्या व जेवणाच्या वेळा पाळणे बंधनकारक असेल. नाष्टा सकाळी ७.४५ पर्यंत, दुपारचे जेवण १२.०० ते २.०० आणि रात्रीचे जेवण ८.०० ते १०.०० या वेळेत देणे आवश्यक आहे.

२१. शासकीय, निमशासकीय शैक्षणिक संस्थांच्या वसतिगृहाची मेस चालविण्याचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारास प्राधान्य देण्यात येईल. त्यासाठी त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२२. प्रत्येक मेसच्या ठिकाणी अन्न शिजवणे, स्वच्छता राखणे, अन्न टेबलावर वितरण करणे प्रत्येक ठेकेदारास बंधनकारक आहे.

२३. वसतिगृहामध्ये चांगले, निर्जतूक, स्वच्छ अन्न देण्याची जबाबदारी प्रत्येक ठेकेदाराची आहे. मेसमध्ये अस्वच्छता, विषबाधा यासारखा अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील. व त्यानुसार त्याचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

२४. संबंधित ठेकेदारास बाहेरील कोणत्याही प्रकारचे तयार अन्न पदार्थ भोजनालयात आणता येणार नाहीत.

२५. विद्यार्थ्यांना ताजे व स्वादिष्ट तयार केलेले गरम जेवण देण्याची व्यवस्था बंधनकारक आहे.

२६. अधिक माहितीसाठी वसतिगृह प्रमुख, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली यांच्याशी कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**वरील सर्व अटी मी वाचल्या असून त्या मला मंजुर आहेत**

कंत्राटदाराची सही व शिक्का

## कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली

वसतिगृहातील विद्यार्थ्याकरीता समूह/ठेका तत्वावर नाष्टा व स्वयंपाक (जेवण) पुरवठ्यासाठी शर्ती

| | |
|---|---|
| खंड १ — एखाद्या ठेकेदाराचे दरपत्रक मंजूर झाल्यानंतर अटी व शर्तीनुसार सदर ठेकेदाराने काम करणे बंधनकारक आहे. सदर अटी व शर्तींचे पालन करण्यामध्ये ठेकेदाराकडून दिरंगाई झालेली आढळून आल्यास प्रत्येक वेळेस रू. १०,०००/— मात्र एवढा दंड आकारण्यात येईल व सदर दंड दिलेल्या मुदतीत भरणे ठेकेदारास बंधनकारक राहील. | अटी व शर्तीप्रमाणे ठेका पूर्ण न केल्यास करावयाची कारवाई |
| खंड २ — अटी व शर्तीनुसार संपूर्ण शैक्षणिक वर्षामध्ये जेवण पुरविण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. यामध्ये काही कारणास्तव मेस बंद राहील्यास किंवा ठेकेदार मेसचा ठेका संपण्यापूर्वी सोडून गेल्यास संबंधीत ठेकेदारास प्रतीदिन प्रती विद्यार्थी रू. ५०/— या प्रमाणे दंड आकारण्यात येईल व सदर दंड भरणे बंधनकारक राहील. दंड न भरल्यास नाईलाजाने प्रशासनास अशा ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. | अटी व शर्तीप्रमाणे ठेका पूर्ण न केल्यास करावयाची कारवाई |
| खंड ३ — जर ठेकेदाराने किंवा त्याच्या कामगारानी कोणतेही भोजन शिजवण्यासाठी ताब्यात दिलेले साहित्य, इमारत, रस्ता, कुपंण इ. ची मोडतोड किंवा नुकसान केले तर तो ते दुरूस्त करेल किंवा नादुरूस्त भाग बदलून देईल. आणि काही नुकसान पोहचले तर ते तो स्वखर्चाने भरून देईल. आणि तसे करण्याचे नाकारले किंवा ते तो करण्यास चुकला तर दरपत्रक मागविणारा अधिकारी ठेकेदाराच्या खर्चाने ते नुकसान भरून काढील व ठेकेदारास देय असलेल्या किंवा देय होतील अशा कोणत्याही कामांमूधन अथवा सदर महिन्याच्या त्याच्या कामाच्या देय असलेल्या बिलातून परस्पर वसतिगृह प्रशासनामार्फत वसुल करण्यात येईल. | नुकसान भरपाईसाठी कारवाई |
| खंड ४ — ठेकेदार आपल्या ठेक्याच्या रीतसर पालनासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य अंतिम सुपूर्दगीच्या दिनांकापर्यत / मुदत संपल्यानंतर ताब्यात घेतलेले संपूर्ण साहित्य वसतिगृह प्रशासनाकडे प्राधिकृत अधिकाऱ्याच्या समक्ष सुस्थितीत त्वरीत परत करावयाचे आहे. | ठेकेदाराच्या रीतसर पालनासाठी साहित्य संयंत्र पुरविणे |
| खंड ५ — ठेकेदार आपल्या कामगारांना झालेल्या क्षतीबदद्ल क्षमीक भरपाई अधिनियम १९२३ (१९२३— ४/८) या पुढे त्यास उक्त अधिनियम असे म्हटले आहे. याखाली कोणत्याही भरपाई देण्यास जबाबदार राहील व ती तो देईल, जर उक्त अधिनियमाच्या कलम १२ पोट कलम (१) खाली अशी भरपाई विद्यापीठ ठेकेदाराच्या वतीने प्रकर्ता म्हणून दिली तर ती विद्यापीठाला उक्त कलमांच्या पोट कलम (२) खाली ठेकेदाराकडून वसूल करता येईल. अशी भरपाई वर खंड १ मध्ये नेमून दिलेल्या रितीने वसूल केली जाईल. | श्रमीक भरपाई |

| | |
|---|---|
| खंड ६ – ठेक्यात समाविष्ठ असलेल्या बाजारातील दर किंवा अन्य दर आपल्या ठेक्याच्या कालावधीत वाढले आहेत या कारणावरून ठेकेदाराने वाढीव दरासाठी सांगीतलेल्या कोणत्याही दाव्याला किंवा दाव्यांना मान्यता दिली जाणार नाही. म्हणजेच ठेकेदाराने ठेक्यात नमूद केलेल्या दराने मेस चालविण्यास बंधनकारक आहे. | ठेकदाराने ठेक्यात दिलेल्या दराने काम पूर्ण करणेस बांधील राहील. |
| खंड ७ – कोणताही ठेकेदार बाल कामगार कामास ठेवणार नाही व तसे केल्यास होणाऱ्या कारवाईस ठेकेदार स्वत: जबाबदार राहील. | कामावर ठेवलेल्या व्यक्तीचे किमान वय १८ वर्षेवर असावे. |
| खंड ८ – ठेकेदारास द्यावयाचे पैसे प्रत्येक महिन्याच्या हजेरीनुसार ठेकेदारालाच मेस बिलाची वसुली करावी लागेल. | पैसे चुकते करण्याची पध्दत |
| खंड ९ – ठेकेदाराने पुरवावयाचे जेवण हे अटी व शर्तीतील बाबवर्णनाप्रमाणे असणे बंधनकारक आहे. | साहित्याचे बनावटी बाबत |
| खंड १० – ठेका मंजूर झाल्यानंतर मजूर कायद्याअंतर्गत करावी लागणारी सर्व बाबींची पूर्तता करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. | मजूर कायद्यांतर्गत करावयाची पूर्तता |
| खंड ११ – ठेकेदारने वेळोवेळी काम करणेस दिरगांई किंवा टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर कार्यवाही करणेत येईल. | सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणे |
| खंड १२ – ठेक्यातील काम करताना विद्यापीठाच्या मालमत्तेचे नुकसान होणार नाही यांची पूर्ण दक्षता ठेकेदाराने घेणे आवश्यक आहे. नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण भरपाई पुरवठादाराकडून करून घेण्यात येईल. | मालमत्तेचे नुकसान |
| खंड १३ – निविदेतील कोणत्याही एका बाबीकरीता किंवा संपूर्ण कामाकरीता आगावू पेमेन्ट दिले जाणार नाही | आगावू पेमेन्ट बाबत |
| खंड १४ – निविदेतील कामाच्या अनुषंगाने कोणताही वाद/तंटा/मतभेद निर्माण झाल्यास मा. सहयोगी अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली यांचा निर्णय अंतिम राहील व तो उभयतांवर बंधनकारक राहील. | अंतिम निर्णय |
| खंड १५ – जो कोणताही ठेकेदार या शर्तीचा स्विकार करणार नाही त्याला कामाची निविदा भरू दिली जाणार नाही व त्याचे नाव विद्यापीठाच्या ठेक्याच्या यादीमधून काढून टाकण्यात येईल. | अटी व शर्ती स्विकृत न केल्यास |

**वरील सर्व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मंजुर आहेत**

कंत्राटदाराची सही व शिक्का

- <u>भोजनाच्या मेनूची यादी</u>

| पदार्थाचे नाव | |
|---|---|
| **शाकाहारी जेवण (अमर्यादित)** | |
| **उसळ** – मटकी उसळ, चवळी उसळ, मुगाची उसळ, पिठल | यापैकी दररोज एक पदार्थ |
| **भाजी** – भेंडी मसाला, वांग + बटाटा, कुरमा, बटाटा सुकी भाजी,, माठ, मेथी, आलू पालक | यापैकी दररोज एक पदार्थ |
| साधा भात/पुलाव | यापैकी दररोज एक पदार्थ |
| चपाती | दररोज |
| वरण/आमटी | यापैकी दररोज एक पदार्थ |
| ताक/दही/कढी/मठ्ठा | आठवडयातून दोन ते तीन वेळा |
| कोशींबीर | आठवडयातून दोन ते तीन वेळा |
| लोणचे, पापड, कांदा (मर्यादित) | दररोज |
| **मांसाहारी जेवण** | |
| **मच्छी** – बांगडा, कोळंबी, सरंगा, सुरमई, बांगडाकरी, कोळंबीकरी,<br>**चिकन/मटण** – करी, मसाला | आठवडयातून दर रविवारी<br>मांसाहारी विद्यार्थ्यांसाठी |
| **अंडा** – करी, मसाला, आमलेट | आठवडयातून दर बुधवार व शुक्रवारी<br>मांसाहारी विद्यार्थ्यांसाठी |
| खीर, फ्रुटसॅलेड, शिरा, भजी | यापैकी एक पदार्थ<br>शाकाहारी विद्यार्थ्यांसाठी |
| सोलकडी, ताक | यापैकी एक पदार्थ |
| साधा भात/पुलाव | यापैकी एक पदार्थ |
| चपाती | |
| कोशींबीर | |
| लोणचे, पापड, कांदा (मर्यादित) | |
| **स्वीट डीश** (मर्यादित) | |
| आमरस | गोड जेवणाचेवेळी यापैकी एक पदार्थ<br>आठवडयातून दर रविवारी<br>शाकाहारी विद्यार्थ्यांसाठी |
| गुलाबजाम | |
| श्रीखंड | |
| बासुंदी | |
| आम्रखंड | |